महाराष्ट्र शासन

**जिल्हा उपआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय सांगली यांचे कार्यालय**

डॉ.आंबेडकर रोड, जिल्हा पशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय आवार, मिरज ४१६४१०

दुरध्वनी क्रमांक 0233-2222233 ई-मेल आयडी - ddcahsangli@gmail.com

जा.क्र./जिउपदुसां/ जिकृरेकेंमि/द्रवनत्र वाहतुक दरकरार/ ५४१ /२०२५, मिरज, दिनांक :-१०/१२/२०२५

## जाहीर नोटीस

प्रति,

लागू असेल त्या

वाहतूक ठेकेदार यांना....

विषय - जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, मिरज जि.सांगली या संस्थेकरिता व जिल्ह्यातील सर्व शासकीय पशुवैद्यकीय संस्थांना कृत्रिम रेतनासाठी आवश्यक असलेल्या द्रवनत्र व गो.रे.मात्रा जिल्ह्यात अथवा जिल्ह्याबाहेर वाहतूकी करिता आवश्यक वाहन दरकराराद्वारे उपलब्ध होणेकरिता दरपत्रक मागविणेबाबत...

सांगली जिल्ह्यातील सर्व पशुवैद्यकीय संस्थांना आवश्यक असणारे द्रवनत्र गोठीत रेतमात्रा जिल्ह्यातून व जिल्ह्यावाहेरुन आणून पुरवठा करणेसाठी जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र मिरज जिल्हा सांगली या संस्थेस वाहनाची गरज असून त्यासाठी तातडीने दरकरार करणे प्रस्तावित आहे. या संस्थेकरिता आवश्यक सर्व करासह वाहनाचे वाहतूकीचा दर प्रती किलोमीटर या तत्वावर पुरवठा करावयाचा आहे. तरी लिफाफाबंध दरपत्रके वाहनाच्या सर्व अनुषंगिक कागदपत्राची पूर्तता करुन दरपत्रकासह दि.११/१२/२०२५ ते १८/१२/२०२५ रोजी दुपारी १४.०० वाजेपर्यंत जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय मिरज, डॉ.आंबेडकर रोड, जिल्हा पशुवैद्यकिय सर्व चिकित्सालय आवार, मिरज येथे कार्यालयीन वेळेत पोहोचतील अशी दक्षता घ्यावी. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. दरपत्रक मंजूर अथवा नामंजूर करणेचे सर्व अधिकार समितीस राहतील दरपत्रके दि.१९/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हास्तरीय समितीसमोर उघडण्यात येतील.

दरपत्रकामध्ये नमूद दर हे सर्व करासहित व खर्चासहित या कार्यालयास पोहोच तत्वावर देण्यात यावेत. सदर करारातील दर हे सन २०२५-२६ करिता खातेस्तरावरील प्रस्तावित दरकरार प्रक्रिया अंतर्गत प्राप्त दर मंजूर होईपर्यंत लागू राहतील. सदर आवश्यक वाहतूक दरकरार प्रक्रिया सुरु असताना जर खाते स्तरावरील भावबंध करार उपलब्ध झालेस सदरची दर पत्रकाद्वारे करार प्रक्रिया रद्द करणेत येईल. याची नोंद घ्यावी.

**सोबत - नियम व अटी**

सदस्य सचिव
स्थानिक खरेदी समिती तथा
सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
जिल्हा उपआयुक्त,पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय कार्यालय सांगली

**प्रत -**

१. जिल्हा परिषद सांगली यांचेकडील नोटीस बोर्डवर लावणेकरीता
२. जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय,मिरज जि.सांगली यांचेकडील नोटीस बोर्डवर लावणेकरीता.
३. सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, मिरज यांचेकडील नोटीस बोर्डवर लावणेकरीता.
४. सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तालपसचि, सांगली यांचेकडील नोटीस बोर्डवर लावणेकरीता.